माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३७५४ / २०२४ / सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| बापु शंकर लांडगे | नायब तहसीलदार, तहसिल कार्यालय कराड ता.कराड, जि.सातारा | तहसिलदार, तहसिल कार्यालय कराड ता.कराड, जि.सातारा |

**( सुनावणी दिनांक - १७ / ११ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १९.०६.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील निकाली काढल्याने " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. अपिलार्थी यांनी Online पद्धतीने सुनावणीची विनंती केली आहे, परंतु काही तांत्रिक कारणास्तव त्यांचे म्हणणे एकूण घेता आले नाही.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २७.०३.२०२४ | जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालवधीतील तहसिल कार्यालय कराड, विभागातील CCTV फुटेज मिळावी. |

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. २०.०५.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर देवून सी.सी.टी.व्ही. कॅमेरा खराब झाला असल्याने फुटेज उपलब्ध करून देता येत नसल्याबाबत कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या

प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेवून दि. २४.०५.२०२४ रोजी मागितलेली माहिती उपलब्ध नसल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविले असल्याने सदर अपील अर्ज निकाली काढला आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेज बाबत माहिती अर्ज करण्यापूर्वीच त्या सी.सी.टी.व्ही. मध्ये तांत्रिक बिघाड झाला असल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. त्यामुळे जी माहिती उपलब्धच नाही, ती माहिती देणे शक्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३७५४ / २०२४ / सातारा 10837/2025 दिनांक - 11/12/25